



॥ श्री ॥

## अध्यात्म आणि जीवन

*प.पू. मंदाताई गंधे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेतील काही भाग –*

--"अध्यात्म आणि जीवन" या शीर्षकाचा एक प्रदीर्घ लेख (एकूण पाच भाग) इतर सात लेखांसह या पुस्तकांत आहे. या लेखांत "सुखी व सफल जीवनासाठी अध्यात्मशास्त्र कसे उपयुक्त आहे" या जिव्हाळ्याच्या विषयाचा अतिशय मार्मिक उहापोह केलेला आहे. अन्य लेखही याच आशयाला समर्पित आहेत --

लेख वाचीत असतांना सतत जाणवत राहते की लेखक बेजोड विद्वान आहे, त्यांचे शब्दसामर्थ्य अलौकिक आहे, त्यांच्या विषयाच्या आकलनांत यथार्थता आहे, त्यांची संबोधस्पष्टता स्फटिकतुल्य आहे, त्यांची बहुश्रुतता चौफेर आहे, त्यांचे प्राचीन - अर्वाचीन पौर्वात्य वाङ्ग्मयाचे वाचन प्रचंड आहे. अध्यात्मासारखा दुर्गम विषय वाचकांपुढे ठेवतांना मांडणी ओघवती, मार्मिक, सोपी, सहज, नेमकी, निर्भीड व रसाळ आहे. शिवाय लेखकाने ज्या आत्मविश्वासाने आध्यात्मिक मूल्यांचा प्रत्ययकारी पुरस्कार या लेखांमधून केला आहे ती मूल्ये त्यांच्या अनुभव क्षेत्रातलीच आहेत, हे वाचकाला जाणवल्याशिवाय राहात नाही. त्यामुळेच लेखक वाचकाच्या मनावर त्यांच्या स्वतंत्र लेखनशैलीचा ठसा उमटवून जातो. लेखकाचा परखडपणा व सडेतोडपणा वाचकमनाला भावल्याशिवाय राहात नाही. लेखकाच्या संपूर्ण लेखनावर श्रीमद्‌भगवद्‌गीता, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व संत वाङ्ग्मय या अक्षर वाङ्ग्मयाचा व त्यातील अद्वैतसिद्धांताचा विलक्षण प्रभाव आहे. वाचन करतांना वाचकही नकळत त्याच प्रभावात जातो व क्षणभर का होईना, अतुल आनंदात निमग्न होतो. पुस्तकांतील काही प्रत्यक्ष अवतरणे पाहू म्हणजे वरील बाबींचा वाचकाला प्रत्यय येईल.

१. "शुद्ध परमार्थाची निकड" या लेखांत, "परमार्थ हे एकमेव व खर्‍या व शाश्वत सुखाचे साधन आहे व ते वैराग्याखेरीज हाती लागत नाही, हे दासबोधाचे सार आहे",
२. "मानवी पुनर्वसन" मध्ये, "मतांच्या राजकीय व्यूहरचनेमुळे हिंदूना विषमतेची वागणूक हिंदूंकडूनच मिळते". पुनर्वसन ही संकल्पना फारच वेगळा आयाम स्पष्ट करते." "जीवाची स्वरूपच्युती, त्यामुळे तो बद्ध व त्याचे स्वरुपी पुनर्वसन होते तेव्हा तो नित्यमुक्त स्थितीत प्रस्थापित होतो."
३. "हिंदू धर्म" मध्ये (अ)"धारणात् धर्म:" या परिभाषेचा आशय अति नावीन्यपूर्ण पण समर्पक सांगितला आहे, तो असा,

"समाज ज्याचे आधारे स्वतःच्या हितासाठी स्वतः बंदिस्त राहतो तो धर्म".(ब)हिंदूंना सावधगिरीचा गर्भित इशारा देणारे हे मर्मस्पर्शी शब्द पहा, "तलवार, भाकरी, औषधे व पैसे यासारख्या प्रसारमाध्यमांनी ते विचलीत होणार नाहीत. असे हिंदुत्व आम्हा सर्वांना लाभो ही जगदीशचरणी प्रार्थना."
४. "तत्वज्ञान आणि साधना" मध्ये हा नेमकेपणा लक्ष वेधतो. पहा, (अ)"साधना करायची ती आत्मप्राप्तीसाठी नसून अविद्या निवृत्तीसाठी असते" (ब)प्रश्नोपनिषदातील दाखला देतांना "उतावीळ शिष्य व घाईगर्दीचे गुरू असा प्रकार त्यांच्यापाशी नव्हता. तसेच मोकाट शिष्य व बहकलेले गुरू असेही परस्पर सामंजस्य नव्हते."
अध्यात्म आणि जीवन भाग १ व भाग ५ मध्ये आधुनिक रसिकतेचा खरपूस समाचार घेण्यापुरते लेखकाचे मनोधैर्य वाखाणण्यासारखे आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था, चतुर्विध पुरूषार्थ, अंतःकरण चतुष्टय, मानवसेवा, सुखदुःख, आत्मसुखाचा अनुभव, ज्ञान, भक्ती, ध्यान, योग, जगण्याची प्रेरणा, प्रारब्ध, कर्मयोग, ईश्वरउपासना, मृत्युनंतरची गती, अस्तित्व-ज्ञान-सुख या प्रेरणांचे प्रकृती-विकृती व संस्कृती अशा तीन भागांत केलेले विवेचन हे सर्व उत्तमोत्तमच आहे. अध्यात्मशास्त्राची उद्दीष्टे पहा कशी सुस्पष्ट रेखाटली आहेत. "अस्तित्वाची विकृत प्रेरणा नष्ट करणे, सहज प्रेरणा बाधित करणे व समाजासाठी त्या प्रेरणेचे उदात्तीकरण करून लोकसंग्रह करणे ही अध्यात्मशास्त्राची उद्दीष्टे आहे" ---

विषयानुक्रमणिका -

(१)शुद्ध परमार्थाची निकड (२)मानवी पुनर्वसन (३)हिंदू धर्म (४)चार पुरूषार्थ (५)समाज आणि धर्म (६)आध्यात्मिक मानसशास्त्र (७)तत्वज्ञान आणि साधना (८)अध्यात्म आणि जीवन (भाग १ ते ५)

"मानवी पुनर्वसन" मधून --
सर्वधर्मसमभावाचे नारे जसे भारतात लावले जातात तसे जगात कोणत्याच देशात लावले जात नाहीत. आणि या समभावात हिंदू धर्म जितका विस्थापित झाला आहे तेवढा अन्य कोणताच झालेला नाही! इतर सर्व धर्म आपापले बहिरंग अत्यंत कडवेपणाने सांभाळून आहेत. मतांच्या राजकीय व्यूहरचनेमुळे हिंदूंना विषमतेची वागणूक हिंदूंकडूनच मिळते. "परधर्मधार्जिणेपणा" हा कोणत्याही पक्षाच्या नेत्याचा सद्‌गुण ठरत आहे. "मुलुख बडवावा की बुडवावा I धर्म रक्षणाकारणे ॥" हे समर्थसूत्र या संदर्भात पूर्णपणे मार्गदर्शक आहे. सर्व प्रकारची धार्मिक क्रांती फक्त हिंदू धर्मातच व्हावी असे राजकीय नेते व परिवर्तनवादी सामाजिक नेत्यांना वाटत असते. केव्हांच संपलेल्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे भांडवल करून हिंदू धर्माला धोपटण्याची संधी कोणीच सोडीत नाहीत. --
आत्मा असंग असल्याने विरक्त आहे. पण तो जीवरूपाने जणू विस्थापित झाल्याने त्याचे पुनर्वसन करण्यासाठी जीवाला वैराग्य संपादन करून पुन्हा असंग व्हावे लागते. वैराग्याच्या बैठकीवर सगुण किंवा निर्गुण उपासना दर्जेदार होऊन त्या उपासनेतून मोक्ष सिद्ध होतो. विस्थापित झालेला बद्ध हा मुमुक्षू व साधक होत होत मूळच्या नित्यमुक्त स्थितीत प्रस्थापित होतो, त्याचे पुनर्वसन होते.

"हिंदू धर्म" मधून-
वेदांच्या शिकवणीचे मनोगत लक्षात घेऊन त्याप्रमाणे रचलेल्या स्मृतिग्रंथांनुसार जीवन जगण्याच्या पद्धतीला "हिंदू धर्म" असे म्हणतात. हिंदू हा शब्द वैदिक या शब्दाऐवजी अनाहूतपणे आलेला आहे. आज अस्तित्वात असलेल्या इस्लाम व ईसाई धर्मांचा संदर्भ वेदकाली नसल्याने वैदिक धर्माला स्वतंत्र नाव देण्याचे कारणच नव्हते. इस्लामचे कुराण, ईसाईंचे बायबल त्याप्रमाणे हिंदूचा "स्मृती" हा धर्मग्रंथ आहे. मनु, याज्ञवल्क्य, भगवद् गीता इत्यादी स्मृती हे हिंदूचे धर्मग्रंथ

आहेत. सर्व धर्मांच्या ग्रंथांच्या प्रामाण्याविरुद्ध बंडे झाली आहेत व होत आहेत. त्याप्रमाणे स्मृतीविरुद्धसुद्धा ती झाली आहेत व होत आहेत. स्पिनोझा व व्होल्टेर यांनी ज्यु आणि ईसाईंच्या धर्मग्रंथांना आव्हाने दिली.
किमान वीस स्मृतीग्रंथ आज उपलब्ध आहेत. नष्ट झालेले किती याची कल्पना नाही. यावरून एक गोष्ट निश्चित होते की, कोणतीही स्मृती हा एकमेव ग्रंथ नसून त्यांत बदल करण्यास भरपूर वाव होता. त्यावेळी जर असा वाव होता, तर आजही तसा असण्यास हरकत घेण्याचे कारण नाही. सनातनी मंडळींनी ही वस्तुस्थिती पुरेशी विचारात घेतली नसावी. पाराशर स्मृती कलीयुगासाठी आहे, असे त्याच स्मृतीच्या सुरूवातीला म्हटले आहे. --
चार वर्ण ही संकल्पना हल्ली अत्यंत बदनाम झाली आहे. स्वभावविशेषानुसार असलेल्या गटाला "वर्ण" असे म्हणतात तर व्यवसायानुसार जाती ठरतात. -- आजही पुढाऱ्याचा मुलगा पुढारी, खेळाडूचा मुलगा खेळाडू, नटीची मुलगी नटी, डॉक्टरचा मुलगा डॉक्टर इ.प्रकारे परंपरा चालू असल्याचे स्पष्ट दिसते. सुतार, कुंभार, चांभार, पुरोहित इ. जाती अशाच निर्माण झाल्या. या जातींमध्ये निर्माण झालेल्या भिंती ही खास भारतीय समस्या आहे. --
हिंदू धर्म केवळ गर्व करण्याची बाब नाही. तशीच ती दुर्लक्ष करण्याची गोष्ट नाही. हिंदुत्व ही आयुष्याची जबाबदारी आहे. ही जबाबदारी जेवढे अधिक हिंदू जाणीवपूर्वक पार पाडतील तेवढे हिंदुत्वाचे वैभव वाढेल. तलवार, भाकरी, औषधे व पैसे यासारख्या प्रसारमाध्यमांनी ते विचलीत होणार नाहीत. असे हिंदुत्व आम्हा सर्वांना लाभो ही जगदीशचरणी प्रार्थना.

"चार पुरूषार्थ" मधून -
--संत तुकाराम या शरीराला "उजेडाची वाट" म्हणतात. बाकी शरीरे अंधाराकडे नेणाऱ्या वाटा आहेत. हा धर्म साध्य होण्यासाठी पूर्व तयारी म्हणून माणसाला आचरणाचे जे नियम घालून दिले आहेत, त्यांना "धर्म शास्त्र" असे म्हणता येईल. धर्म आणि धर्म शास्त्र यांतील मुख्य अंतर आपण लक्षात घेऊ. धर्म साध्य होण्यासाठी अंतःकरण शुद्ध व शांत व्हावे लागते. पशूतुल्य जीवनाने हे अशक्य आहे. पशू निदान आहार, निद्रा, मैथुन एवढ्यावर जगू तरी शकतो. माणसाला याशिवाय आणखी बरेच काही आवश्यक वाटते. या गरजा मर्यादेने बंदिस्त केल्या नाहीत तर माणूस पशूहून भयंकर बनतो. या मर्यादांना "धर्मशास्त्र" असे म्हणतात. या मर्यादा कालमानानुसार बदलल्या पाहिजेत. --
मोक्ष हा चिरंतन सुखाचा ठेवा आहे. हे सुख कोणावर किंवा कशावर अवलंबून नाही. त्याला कशानेही छेद जात नाही. ते कधीच कमी होत नाही. त्यात दुःखाचा लेशही असत नाही. त्याला "आनंदघन" असे म्हणतात. गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरूष, उच्च-नीच, विद्वान-अविद्वान इत्यादी कोणत्याही विशेषाचा व त्याचा प्रत्यक्ष संबंध नाही. म्हणजे तो त्यावर अवलंबून नाही. असे निरपेक्ष सुख, शांती व समाधान हे मोक्षाचे स्वरूप आहे.

"आध्यात्मिक मानसशास्त्र" मधून -
आतापर्यंत केलेल्या विचाराचा हेतू असा आहे की मन व मनाचे सामर्थ्य याचा मनानेच केलेला विचार व त्याचे मानवी जीवनातील स्थान याचा किंचित अंदाज यावा हा आहे. व्यावहारिक मानसशास्त्र सापेक्ष विषयसुखाचा विचार करते तर पारमार्थिक मानसशास्त्राची रचना निरपेक्ष मोक्षसुखाच्या हेतूने केलेली आहे. ह्या हेतूमधील फरक स्पष्टपणे लक्षात घेतला तर आध्यात्मिक मानसशास्त्राची वैज्ञानिक मानसशास्त्राची तुलना करण्याचा मोह होणार नाही. --

मन व बुद्धी यांचा आतापर्यंत जो विचार केला त्याचा मुमुक्षूला काय उपयोग होतो याचा विचार आता करता येईल. "जन्म घेणे लागे वासनेचे संगे" असा नियम आहे. वासना ही बुद्धीमध्ये राहते. निर्णय घेणे हे बुद्धीचे काम असल्याने बुद्धीतील वासनांनुसार बुद्धीचे निर्णय होतात व ते जीवाच्या प्रवृत्तीच्या रुपाने व्यक्त होतात. "संचित तैसी बुद्धी उपजे मनामाजी" असे तुकाराम महाराज याच दृष्टीने म्हणतात. हे निर्णय इंद्रियापर्यंत पोहोचविण्याचे व त्यांना प्रवृत्त करण्याचे काम बुद्धी व इंद्रिये

यांच्यामध्ये राहणारे मन करते. हे लक्षात घेतले तर इंद्रियांच्या निषिद्ध प्रवृत्तीसाठी मनाला जबाबदार धरणे चुकीचे आहे हे सहज कळेल. अशा प्रवृत्तींना वासना जबाबदार असून बुद्धी व मन ही केवळ वासनांच्या अभिव्यक्तींची माध्यमे आहेत. म्हणून वासनांचे स्वरूप बदलून बुद्धी निर्वासन करणे हे साधनांचे वर्म आहे.

"तत्वज्ञान व साधना" मधील काही भाग -
अन्न ज्याप्रमाणे खावे लागते, चावावे लागते व मग पचनशक्ती चांगली असल्याने ते जिरते, त्याचप्रमाणे तत्वज्ञान ऐकावे लागते, त्याचा विचार करून स्वतःच्या प्रकृतीला अनुरूप असा निश्चय करावा लागतो. तत्वज्ञानाने जीव, जगत् व जगत् कारण यांचे स्वरूप व परस्परसंबंध यांचा निश्चय झाल्यावर त्या जगत् कारणाचे त्या निश्चयाप्रमाणे दर्शन होण्यासाठी किंवा अनुभवासाठी साधना करावी लागते. ---
काम, क्रोध व लोभ यांचा प्रत्यक्ष त्याग केला असता चित्त अत्यंत शुद्ध होते. केवळ शुद्ध चित्तालाच सगुणाची खरी उपासना करता येते व त्याने चित्त शांत बनते. अशा रितीने मायेची मलशक्ती व विक्षेपशक्ती नाहीशी झाल्यावर गुरूवाक्याच्या चिंतनाने आवरण शक्ती आवरली जाऊन आत्मज्ञान होते. म्हणून साधनावाचून केवळ तत्वज्ञानाने आत्मज्ञान मिळवू पाहणे हे केवळ मृगजळामागे धावण्यासारखे आहे. ---
परमहंस स्थितीला पोहोचून परिव्राजकव्रत पत्करलेले महात्मेसुद्धा गीतारूप मानससरोवरात विहार करतच राहतात. विहाराच्या आवडीबरोबरच प्राप्त झालेल्या परमहंसस्थितीत बिघाड होऊ नये असाही त्यांचा हेतू असतो. त्यांनाही सावध रहावे लागते. मग साधकाने अत्यंत जागरूक राहून साधन करावे हे काय सांगायचे !

"अध्यात्म आणि जीवन" चे एकूण पाच भाग आहेत. या भागातील रचना विषयावार आहे. त्यांतील केलेले विवरण केलेले विषय असे - १.सुखाचा वेध २. अध्यात्मशास्त्र व विज्ञान ३. अध्यात्मशास्त्राची प्रणाली. ४. सत् -चित्-आनंद, अ-सुख, ब-आत्मसुखाचा अनुभव - ज्ञानयोग, भक्तियोग व ध्यानयोग, क-जाणण्याची प्रेरणा, ५. प्रारब्ध, ६. कर्मयोग, ७. ईश्वर, ८. उपासना, ९. मानवसेवा. या प्रत्येक शीर्षकाखाली अध्यात्म व जीवन यांच्यातील अखंड दुवा दाखविला आहे. अध्यात्म हे जीवन जगण्याची रीत कशी होते ते स्पष्ट केलेले आहे.
या प्रकरणांमधील काही भाग -
मानवी जीवन अर्थपूर्ण होण्यासाठी, सफल व यशस्वी होण्यासाठी त्या जीवनाचा तीन अंगांनी विचार करावा लागतो. चरितार्थ, सुख व सुखरूपता अशी ती तीन अंगे आहेत. त्या प्रत्येक अंगाची स्वतंत्र विद्या आहे. --- अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, करमणूक, आरोग्य, क्रीडा, साहित्य, कीर्ती, सत्ता, कला असा ह्या चरितार्थाच्या विकासाचा क्रम आहे. ह्या सर्वांचा चरितार्थात समावेश होतो व त्या प्रत्येकाचे शास्त्र किंवा विद्या आहे. यांतील प्रत्येक बाब कित्येकांच्या चरितार्थाची विद्या होऊ शकते. -- अन्नापासून कलेपर्यंत चरितार्थाची साधने उपलब्ध झाल्याने जीवन सफल होऊ शकते का? ते सुखी होते का? ह्याचे उत्तर अगदी स्पष्टपणे "नाही" असे आहे.

धर्म जीवनाने माणसाचे मन शुद्ध व शांत होण्यास मदत होते. ह्या पायावर सुखरुप जीवनाची उभारणी करता येते. सुखरूप होऊन सुखाने जगणे व शेवटी सुखाने शरीर व जग सोडून जाणे हा अध्यात्मशास्त्राचा एकमेव हेतू आहे. मानवी जीवनाचा दुसरा कोणता हेतू असू शकेल? सुखाचा शोध व दुःखाचा प्रतिकार ह्या प्रवृत्ती सर्वांना जन्मल्यापासूनच असतात. ---
अध्यात्मशास्त्र व जीवन यांचे हेतू जर परस्परपूरक असतील तर मानवी जीवनाच्या साफल्यासाठी अध्यात्मशास्त्राचा उपयोग झाला पाहिजे. अध्यात्मशास्त्राची प्रयोगशाळा म्हणजे मानवी जीवन व मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयासाठी अध्यात्मशास्त्र अशी ती परस्परपूरकता आहे. ---

अध्यात्मशास्त्राचा जीवनशी असलेला संबंध लक्षात घेता प्रारब्धाचा विचार अवश्य करावा लागतो. परिवर्तनवादी विचारवंतांना "प्रारब्ध" या शब्दाची सुद्धा ऍलर्जी आहे. दैववाद, निष्क्रियता, आळस, महत्वाकांक्षेचा अभाव, जिद्दिची उणीव, स्पर्धेच्या जगात टिकण्याची अक्षमता इत्यादी सर्व परिणाम "प्रारब्ध" ह्या पराभूत मनोरचनेमध्ये दडलेले आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणूनच प्रारब्ध ही संकल्पना शांतपणे, तटस्थपणे व वास्तवाच्या जाणिवेतून समजावून घेणे आवश्यक आहे. ---

अध्यात्मशास्त्र जसा प्रारब्धाचा सिद्धांत मांडते, तसा कर्मयोगाचाही उद्‌घोष करते. प्रयत्नवादाचाही हिरीरीने पुरस्कार करते. परंतु प्रयत्न व प्रारब्ध ह्यांत गल्लत करीत नाही. सर्व सामर्थ्य वापरून, कौशल्य पणाला लावून आवश्यक ते ज्ञान संपादन करून, पुरेसा वेळ देऊन अथक प्रयत्न करावे, अपार प्रयत्न करावे, पण त्या प्रयत्नांना येणारे अंतिम फळ प्रारब्ध म्हणून आनंदाने स्वीकारावे. भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला "तू युद्ध कर" असे सतत सांगतात. मोहाने युद्धभूमी सोडून पळून जाऊ पाहणाऱ्या अर्जुनाला, म्हणजे कर्मफळाला घाबरून जाऊन कर्म सोडू पाहणाऱ्या अर्जुनाला ते युद्धासाठी तयार करतात. -- अर्जुन कर्म जाणतो पण कर्मयोग जाणत नाही. युद्ध करणे हे अर्जुनाचे कर्तव्यकर्म आहे. त्याला येणारे यशापयश प्रारब्धाधीन आहे. "जिंकलास तर पृथ्वीचे राज्य मिळेल, धारातीर्थी पडलास तर स्वर्ग मिळेल" अशी दोन नियोजित फळे प्रारब्धाधीन असल्याने कर्म करतांना त्यांचा विचारही करू नये. फळाच्या विचाराच्या व्यग्रतेमुळे कर्मनिष्ठेला बाध येतो. ---

---सुखाने किंवा दुःखाने अंतःकरण कमीजास्त प्रमाणात ढवळले गेल्याने ते अशांत व अस्थिर होते. म्हणून चिदाभास आत्मरूप होण्याची प्रक्रिया घडत नाही, त्यामुळे आत्मानंदाचा अनुभव येत नाही. ह्याच दृष्टीने गीतेने "सुखदुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ" असे म्हटले आहे. कशासाठी किती किंमत देऊन काय साध्य करावयाचे ह्याविषयी ज्याचे गणित तयार नसते तो आत्मानंदाची किंमत देऊन सत्ता, प्रतिष्ठा, संपत्ती, कीर्ती इत्यादी साध्य करण्याचा प्रयत्न करतो. प्रारब्धाधीन असणाऱ्या ह्या सर्व बाबी आपल्या कर्तव्याचा परिणाम म्हणून कमी जास्त प्रमाणात लाभतात पण त्या "साध्य" होऊ शकत नाहीत. त्या वेगळे कष्ट न करताच लाभणाऱ्या असल्याने त्यांचा विचारही न करता म्हणजे त्यांची किंमत मोजून आत्मानंदाचा लाभ पदरात पाडून घ्यावा.
--अंधश्रद्धेमध्ये अंतर्भूत होणाऱ्या सर्व विपरीत व विकृत कल्पना बाजूला सारून अध्यात्माचा विचार करावा. मानवी जीवनाचा केवळ राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्टीने विचार न करता माणसाचे समग्र व्यक्तिगत जीवन विचारात घेऊन त्याचा अध्यात्मशास्त्राशी असलेल्या संबंधाचा अभ्यास व्हावा हा ह्या लेखाचा हेतू आहे.

***